महाराष्ट्र राज्य विद्युतपारेषण कं. मर्या.

CIN No. U40109MH2005SGC153646

**अउदा संवसु मंडल, कळवा**

---

दिनांक:- २१.०८.२०२६

# जाहीर सुचना

औद्यैगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांना सुचित करण्यात येते कि, अउदा. संवसु. मंडल, कळवा मंडलांतगर्त वर्ष २०२४-२५ करीता शिकाऊ उ्मेदवारांना एक वर्ष कालावधीसाठी कराबध्द करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी **http//www.apprenticeshipindia.org** या संकेतस्थळावर शिकाऊ उमेदवारी करिता दिनांक २४.०८.२०२६ (००.०० तासापासून) ते ०७.०९.२०२६ (२४:००) वाजेपर्यंत आस्थापना नोंदणी क्रमांकावर ऑनलाईन अर्ज करावे. आस्थापना नोंदणी क्रमांक व शिकाऊ उमेदवारी पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहेत.

| अनु.क्र. | नांव | आस्थापना नोंदणी क्रमांक | विजतंत्री |
|---|---|---|---|
| १ | अउदा. संवसु.मंडल, कळवा | E10162701237 | ६८ |

- **शैक्षणिक अर्हता -**
  १) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीण.
  २) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औघोगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात परीक्षा उत्तीण.
- **शैक्षणिक दस्तावेज -**
  १) एस.एस.सी. व आय.टी.आय विजतंत्री चार सेमिस्टरचे उत्तीण गुणपत्रिकाची मूळप्रत. २) आधारकार्ड ३) मागसवर्गीय विदयार्थ्याचे जात प्रमाणपत्र ४) महाराष्ट्र राज्याचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र ५) उच्च व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र व इतर सर्व अनुषंगिक आवश्यक कागदपत्रांची मूळप्रत उमेदवारांने स्वत:च्या प्रोफाईलवर स्कॅन करुन अपलोड करावे.
- **विदयावेतन** - प्रचलित नियमाप्रमाणे लागू राहील.
- भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-यांकडून दबाव आणल्यास त्या उमेदवारास भरती प्रकियेतुन बाहेर करण्यात येईल.
- शिकाऊ उमेदवारांची निवड ही एस.एस.सी. व आय.टी.आय. गुणांच्या टक्केवारीनुसार अटी व शर्तीच्या तसेच सामाजिक आरक्षणाच्या अधिन राहून प्रवर्गनिहाय निवड केली जाईल.
- उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करतांना पोर्टलवर आवश्यक मुळ प्रमाणपत्र स्कॅन करून योग्य रितीने अपलोड करणे बंधनकारक आहे. वरिल कालावधीत ऑनलाईन (Online) अर्ज सादर न केल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.
- वयोमर्यादा १८ ते ३८ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथिलक्षम).
- एस.एस.सी. व आय.टी.आय. विजतंत्री गुणपत्रीकेवरील नाव आधारकार्ड मधील नावाशी सुसंगत असणे आवश्यक आहे, अन्यथा आपला अर्ज स्विकारला जाणार नाही.
- ऑनलाईन (Online) अर्ज सादर करतांना उमेदवाराने सधस्थितीत कार्यान्वीत ई-मेल आय-डी (Email id) व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक राहील.
- अपुर्ण चुकीचे व अपु-या कागदपत्रासह सादर केलेले ऑनलाईन अर्ज स्विकारल्या जाणार नाही. अथवा त्याचा विचार केल्या जाणार नाही. तसेच अर्जामध्ये नमुद केलेली माहीती खोटी आढळुन आल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरेल.

Mahabharti.in

- आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारास या कार्यालयाने वेळोवेळी शासनाच्या नियमाप्रमाणे आरक्षणासबंधीत कागदपत्राची मागणी केल्यास ते सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.
- प्रणालीमध्ये बदल झाल्यामुळे या आदी ज्या उमेदवारांनी वरील किंवा याच आस्थापनेच्या इतर आस्थापन नोंदणी क्रमांकावर ऑनलाईन अर्ज सादर केले असेल त्यांनी पुन्हा अर्ज सादर करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी. सदर भरती प्रक्रिये करता फक्त दि. २४.०८.२०२६ ते ०७.०९.२०२६ पर्यंत केलेल्या अर्जाचां विचार केला जाईल. वर नमुद दिनांकाच्या पुर्वी किंवा नंतर ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवरांचा भरती/ निवड प्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही व त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही यांची नोंद घ्यावी.
- ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर या जाहीरातीसह जोडलेला प्रपत्र -अ परीपुर्ण भरुन त्यासह ऑनलाईन सादर केलेल्या अर्जाची प्रत **दिनांक २१.०९.२०२६** सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत **अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय, अउदा संवसु मंडल, कळवा, महापारेषण ऐरोली संकुल, ऐरोली नाका, ठाणे-बेलापुर रोड, ऐरोली, नवी मुंबई ४००७०८** या पत्त्यावर पोस्टाने/स्वहस्ते पोहचेल या बेताने पाठवावे. तसेच सदर प्रपत्र-अ आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रांसह विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास आपला अर्ज भरती / निवड प्रक्रियेसाठी विचारत घेतला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सहपत्र : प्रपत्र - अ

( सही/- )
(विजय आवारे)
अधीक्षक अभियंता
अउदा.संवसु.मंडल.कळवा

Mahabharti.in

**म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित या कंपनीच्या**

## अधीक्षक अभियंता, अउदा, संवसु, मंडल, कळवा

**या कार्यालयाने दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन करावयाचा अर्ज(वर्ष २०२४-२५).**

उमेदवाराने अलिकडे काढलेला पासपोर्ट साईजचा फोटो येथे चिटकवावा व त्यावर स्वाक्षरी करावी. (स्टेपल किंवा पीन लावू नये)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | उमेदवाराचे पूर्ण नाव | : | ________ (आडनाव) ____________ (उमेदवाराचे नाव) ____________________ (वडिलांचे/ पतीचे नाव) |
| २ | उमेदवाराच्या वडिलांचे पूर्ण नाव | : | ____________ (आडनाव) __________ (वडिलांचे नाव) _______________ (आजोबांचे नाव) |
| ३ | लिंग व वैवाहिक स्थिती | : | _____ स्त्री (Female) ________ पुरुष (Male) ________ विवाहीत (Married) _________ अविवाहीत (Unmarried) |
| ४ | उमेदवाराचा पत्रव्यवहाराचा पत्ता:- | | ____________________________________________ ____________________________________________ ____________________________________________ पिन कोड [ ][ ][ ][ ][ ][ ] |
| ५ | उमेदवाराचा कायमचा पत्ता | : | ____________________________________________ ____________________________________________ पिन कोड [ ][ ][ ][ ][ ][ ] |
| ६ | दूरध्वनी/मोबाईल क्र. | : | ____________________ कोड - दूरध्वनी क्र. ________________________ मोबाईल क्र. |
| ७ | ई-मेल आयडी | : | [ ] |
| ८ | जन्म दिनांक | : | [ ][ ] दिनांक [ ][ ] महिना [ ][ ][ ][ ] वर्षे |
| ९ | जातीचा प्रवर्ग (लागू असलेल्या ठिकाणी ☑ अशी खूण करावी) | : | (see table below) |

| अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | ई.डब्लू.एस | खूला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | EWS | OPEN |
| | | | | | | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | अ) महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिका-याचा : जातीचा दाखला जोडला आहे का ? | | होय Yes<br>नाही No |
| | ब) महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम : जात पडताळणी समितीने वैध केलेले जाती वैधता प्रमाणपत्र जोडले आहे का ? | | होय Yes<br>नाही No |
| | क) उन्नत /प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non creamy layer) जोडले आहे का ? ( SC, ST सोडून ) | | होय Yes<br>नाही No |
| ११ | १) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी आहे काय ? | | होय Yes<br>नाही No |
| | २) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत : केलेल्या सक्षम अधिका-याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile) जोडले आहे का ? | | होय Yes<br>नाही No |

**१२ शैक्षणिक पात्रता : (प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात)**

| अ. क्र. | परिक्षेचे नांव | शाळा / मंडळ / विद्यापीठ / संस्थेचे नांव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | मिळालेले एकूण गुण | मिळालेली टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी (१०वी) | | | | | |
| २ | औद्येगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र | | | | | |

**प्रतिज्ञापत्र**

मी असे प्रमाणित करतो/करते की, म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित या कंपनीच्या अधीक्षक अभियंता, अउदा, संवसु, मंडल, कळवा यांच्या कार्यालयाने प्रस्तुत दिलेली जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून ती मला समजली आहे. सदर जाहिरातीत नमूद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी, संपूर्ण व योग्य असून ती चुकीची वा खोटी आढळून आल्यास माझी उमेदवारी रद्द होईल याची व मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील, याची मला पूर्णपणे जाणीव आहे.तसेच, मी सादर केलेली कोणतीही माहिती निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर खोटी अथवा बनावट आढळून आल्यास मला निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

२. मी असेही प्रमाणीत करतो/करते की, माझी निवड झाल्यास मी मंडलाच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही ठिकाणी रुजू होण्यास तयार आहे.

३. मी असे प्रमाणीत करतो की, जाहिरातीत विहीत केलेल्या अटी व शर्ती व निवडप्रक्रिया मला मान्य राहतील.

**स्थळ :**
**दिनांक :**

**उमेदवाराची स्वाक्षरी**

*******